# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६४ वी बैठक दिनांक १३ एप्रिल २०१०

### ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६४ वी बैठक दि. १३ एप्रिल २०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

१. मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर ... मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष
२. मा. इं. एकनाथ बा. पाटील ... सचिव (जसं) व सदस्य
३. मा. इं. मु. सं. मुंढे ... सचिव (लाक्षेवि) व सदस्य
४. इं. प्रफुल्लचंद्र झपके ... कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**विशेष निमंत्रित**

१. मा. श्री. आनंदराव पाटील ... मा. उपाध्यक्ष

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

१. श्री. सुधाकर चव्हाण, उपसचिव ... अप्पर मुख्य सचिव (वने) व सदस्य यांचे प्रतिनिधी
२. श्री. मधुकर कांबळे, अवर सचिव ... प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी
३. श्रीमती ज. आ. खवणेकर, कक्ष अधिकारी ... प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी

**निमंत्रित अधिकारी**

१. इं. सु. ल. पाटील ... मुख्य अभियंता (जसं), पुणे
२. इं. शि. मा. उपासे ... मुख्य अभियंता (विप्र), पुणे
३. श्री. अनिल शिरुडे ... मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम)
४. इं. अ. वा. सुर्वे .... अ.अ. पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे
५. इं. ब. दा तोंडे .... अ.अ. व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,सोलापूर
६. इं. दि. मा. सोनवलकर ... अ.अ. कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ,सांगली
७. इं. भी. अ. पुरी .... अ.अ. कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे
८. इं. कि. बा. कुलकर्णी .... अ.अ. सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा
९. इं. रा. द. मोहिते .... अ.अ. कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(इंजि. प्रफुल्लचंद्र. चं. झपके)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६४ वी बैठक दिनांक १३ एप्रिल २०१०

ठराव क्र. ६४/१

“नियामक मंडळाच्या ६१ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.”

ठराव क्र. ६४/२

“नियामक मंडळाच्या ६२ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.”

ठराव क्र. ६४/३

“ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ६३ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत.”

ठराव क्र. ६४/४

‘‘ठराव करण्यांत येतो की, श्री. गोविंद महादेव धनवडे, रा. भाळवणी, ता. खानापूर, जि. सांगली, यांना भू-संपादन एस. आर. क्र. ६०५ भाळवणी, फळबाग नुकसान भरपाई फरकांतर्गत मूल्यांकन रक्कम + दिलासा रक्कम + व्याज अशी एकूण रुपये ६१,११३/- (अक्षरी रु. एकसष्ठ हजार एकशे तेरा फक्त) एवढी रक्कम सानुग्रह अनुदान स्वरुपात अदा करणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.’’

ठराव क्र. ६४/५

“नियामक मंडळाच्या ६० व्या बैठकीतील ठराव क्र.६०/१४ अन्वये प्रकल्पग्रस्तांसाठी अपवादात्मक प्रकरण (Exceptional case) म्हणून बुध्दिहाळ मध्यम प्रकल्पातील गाळपेर जमीनी प्रकल्पग्रस्त शेतकयांच्या मौजे गौडेवाडी सहकारी सामुदायिक संस्था मर्यादित, गौडेवाडी, यांना २१०.२० एकर व सोमेवाडी सहकारी सामुदायिक संस्था सोमेवाडी यांना ३६३.१० एकर अशी एकूण ५७३.३० एकर (२३२ हेक्टर) जमीन कसण्यासाठी रुपये १००/- प्रतिवर्षे/प्रति हेक्टर या दराने दिनांक ३१/०३/२००९ च्या पुढे ११ महिने मुदतीच्या कराराने भाडेपट्टयाने देण्याचा ठराव पारित करण्यात आला होता. तथापि नियामक मंडळाच्या ५७ व्या बैठकीतील ठराव क्र.५७/०४ च्या अनुषंगाने केलेल्या भाडेकराराची मुदत दि.९/१२/२००९ अखेर संपते त्यामुळे आता असा ठराव करण्यात करण्यात येतो की, सदर जमिन त्याच भाडेपट्टा कराराने दिनांक ३१/०३/२००९ ऐवजी दिनांक ०९/१२/२००९ च्या पुढे ११ महिने मुदतीच्या करारनाम्यानुसार भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे”.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. प्रफुल्लचंद्र. चं. झपके) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची ६४ वी बैठक दिनांक १३ एप्रिल २०१०

ठराव क्र. ६४/६

''ठराव करण्यांत येतो की, सन २००८-०९ च्या तेराव्या वार्षिक अहवालास मान्यता देणेत येत आहे. तसेच हा अहवाल शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे''.

---

ठराव क्र. ६४/७

नियामक मंडळाच्या ५५ व्या बैठकीतील ठराव क्र. ५५/४ मध्ये अंशतः बदल करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना रु. ५.०० लक्ष पर्यंतच्या सुरक्षा अनामत प्रस्तावांना मंजूरी देण्याचे अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

---

ठराव क्र.६४/८

"ठराव करण्यात येतो की, म्हैसाळ योजनेच्या सुमारे रु. ८ कोटी थकीत वीज देयकापैकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने (M.S.E.D.C.) रु.१.०४ कोटी भरल्यानंतर वीज जोडणी करुन देण्याचे मान्य केल्याने सदर रक्कम भरण्यास खालील अटींच्या अधीन राहून नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

अटी -

(१) लाभार्थी शेतकऱ्यांकडून मागणी नमुना अर्ज-७ भरुन, त्यातील अट क्र.१३ स्पष्टपणे विशद करावी. त्यासाठी जाहीर प्रकटन काढण्याची कार्यवाही त्वरेने करावी.

(२) वीज जोडणीसाठी महामंडळाकडून आगावू रक्कम भरली जात असल्याने त्या रकमेची लाभार्थीकडून वसुली करण्याची दक्षता घ्यावी."

---

आयत्या वेळेचे विषय

ठराव क्र. ६४/९

"ठराव करण्यात येतो की, मे. महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन, कोल्हापूर यांचेकडे सोपविण्यात आलेल्या कुकडी प्रकल्पातील डिंभे डावा तीर कालवा कि.मी. क्र.४ ते ७ व ८ ते १० चे कालवा अस्तरीकरण कामाच्या निवीदेच्या अनुषंगाने नियुक्त केलेले सोल आर्बिट्रेटर श्री.व्ही.डी.केतकर यांनी दि.२७/०९/२००३ रोजी निवाडे घोषित केले. त्यानुसार मे. महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन, कोल्हापूर यांना अनुक्रमे रु. ८,५१,८१२/- व रु.७,५५,५९४/- एवढी रक्कम व दि.२८/१०/२००३ पासून ते प्रत्यक्ष रक्कम अदा करेपर्यंत १७ टक्के द.सा.द.शे. व्याज देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. प्रफुल्लचंद्र. चं. झपके) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६४ वी बैठक दिनांक १३ एप्रिल २०१०

ठराव क्र. ६४/१०

"ठराव करण्यात येतो की, मौजे भानसेवाडी ता.जि.सातारा येथील उरमोडी धरणाच्या जलमग्न क्षेत्राच्या बाहेरील सर्वे नं.१६३ जे.एम.सी.क्र.१ ते ४ मधील मिळकत क्र. २४६ ते २५० (५ घरांचे) संपादन करण्यास "अपवादात्मक प्रकरण" म्हणून परवानगी देण्यात येत आहे."

---

ठराव क्र. ६४/११

"ठराव करण्यांत येतो की, चांदोली अभयारण्यामुळे विस्थापित झालेल्या मौजे झोळंबी, ता. शिराळा, जि.सांगली येथील विस्थापित घरांचा मोबदला बाधित खातेदारांना अदा करणेच्या प्रकरणी (मुल्यांकन रक्कम रु. १,२२,९९,४०५/-) महसूल व वन विभागाशी सल्ला मसलत करुन मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने पुढील कार्यवाही करावी."

---

ठराव क्र. ६४/१२

"ठराव करण्यात येतो की, चांदोली धरणासाठी संपादित केलेल्या १३०.०२ हे. जमिनीपैकी मौजे मणदूर, ता. शिराळा, जिल्हा सांगली या गावातील अतिरिक्त असलेले ८५.३४ हे. क्षेत्र भविष्यात महामंडळास लागणार नसल्याने ह्या क्षेत्राची प्रचलित दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर वारणा प्रकल्पग्रस्तांना देण्यासाठी जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

---

ठराव क्र. ६४/१३

"ठराव करण्यात येतो की, जाळगेवाडी, ता. पाटण, जिल्हा सातारा येथील उत्तरमांड जलाशयामुळे बाधित झालेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेचे काम उत्तरमांड प्रकल्पाच्या खर्चातून करण्यास व सक्षम अधिकाऱ्याने तांत्रिक मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकानुसार योजनेसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम जिल्हा परिषद, सातारा, यांचेकडे वर्ग करण्यास "खास बाब" म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

सदर योजनेसाठी जिल्हा परिषद सातारा यांचेकडे निधी वर्ग करताना खालील अटींचे पालन करावे.

१. नवीन पाणी पुरवठा योजनेच्या रु. १५.५६ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास सक्षम स्तरावर तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घ्यावी.

२. सदर कामाचा व त्याप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चाचा अंतर्भाव उत्तरमांड मध्यम प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये करण्यात यावा.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. प्रफुल्लचंद्र. चं. झपके) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६४ वी बैठक दिनांक १३ एप्रिल २०१०

**ठराव क्र. ६४/१४**

**“ठराव करण्यांत येतो की, उस्मानाबाद नगर परिषद उस्मानाबाद नगरपरिषदेस वाढीव पाणीपुरवठा योजनेअंतर्गत इन-टेक वेल, जॅकवेल, ॲप्रोच चॅनेल, स्वीचयार्ड इत्यादि घटकासाठी महामंडळाची गट क्र. ७२ मधील १.३३ हेक्टर जमीन भविष्यात खात्यास लागणार नसल्याने सदर अतिरिक्त असलेल्या जमिनीची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.”**

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**“मान्य”**

सही/-
(इंजि. प्रफुल्लचंद्र. चं. झपके)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे